# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र. उमपा/कर विभाग/५-४/२५/२४
दिनांक २४/०५/२०२४

वाचा- मा प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक /०५/२०२४ रोजी मंजुरी केलेली टिपणी

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात शॉप डालडा डेपो जवळ, उल्हासनगर- ३ या मिळकतीकरीता मालमत्ता क्रमांक २७बीआय००४६६९२०० जुना क्रमांक २७/०३६४ अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन मोहन डी लुल्ला या नावे कर आकारणी सुरु आहे.

२) वर्ष २०२४-२०२५ मध्ये मालमत्ता करापोटी रक्कम रु. १९,४७,३४० + विलंब शास्ती रक्कम रु. १४,६८,७१२ असे एकुण रक्कम रु. ३४,१६,०५२/- थकबाकी आहे.

३) श्री मोहन डी लुल्ला यांनी दिनांक ०२/०५/२०२४ ना.सु.केंद्र टोकन नं ४१२०२४०००१०८२० अन्वये सदर मिळकतीवरील विलंब शास्ती माफ केल्यास उर्वरीत रक्कम भरणा करणेबाबत विनंती केली आहे.

४) सदर मिळकतीचे कराच्या मागणीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ अंतर्गत बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारे विलंब शास्ती रक्कम रु. १४,६८,७१२/- समावेश आहे.

५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ नुसार, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० अन्वये खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः आकारण्यायोग्य असलेली किंवा अंशतः माफ करता येईल. अशी तरतुद आहे

६) त्याअनुषंगाने दिनांक /०५/२०२४ रोजीचे टिपणीमध्ये उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात शॉप डालडा डेपो जवळ, उल्हासनगर- ३ (मालमत्ता क्रमांक २७बीआय००४६६९२०० जुना क्रमांक २७/०३६४) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ अंतर्गत मालमत्ता करावर आकारण्यात आलेली १०० टक्के विलंब शास्ती, नियम ५१ अंतर्गत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन माफ करण्यास मा प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी मंजुरी दिलेली आहे

**७) सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी करदात्यावर खालीलप्रमाणे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

**१) सदर सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा:-** सदरची सवलत सदयस्थितीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. पुर्वी अथवा त्यानंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. तसेच पुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी दावा करता येणार नाही.

२) सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

३) सदर सवलतीचा लाभ घेतल्यानंतर, कराची रक्कम भरणा केल्यानंतर, कोणतेही अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदने, संदर्भ आवेदने, विविध स्तरावरील न्यायालयात दावा दाखल करणे किंवा रिट याचिका दाखल करता येणार नाही. व तसे केल्यास दिलेली सवलत काढुन घेण्यात येईल. विलंब शास्तीसह पुन्हा सुधारीत मालमत्ता कराचे बिल बजावण्यात येईल

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वरील प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे, उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात शॉप डालडा डेपो जवळ, उल्हासनगर- ३ (मालमत्ता क्रमांक २७बीआय००४६६९२०० जुना क्रमांक २७/०३६४) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ अंतर्गत मालमत्ता करावर आकारण्यात आलेली १०० टक्के विलंब शास्ती, नियम ५१ अंतर्गत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन माफ करण्यात येत आहे.

**२) सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी करदात्यावर खालीलप्रमाणे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

**१) सदर सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा:-** सदरची सवलत सदयस्थितीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. पुर्वी अथवा त्यानंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. तसेच पुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी दावा करता येणार नाही.

२) सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

३) सदर सवलतीचा लाभ घेतल्यानंतर, कराची रक्कम भरणा केल्यानंतर, कोणतेही अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदने, संदर्भ आवेदने, विविध स्तरावरील न्यायालयात दावा दाखल करणे किंवा रिट याचिका दाखल करता येणार नाही. व तसे केल्यास दिलेली सवलत काढुन घेण्यात येईल. विलंब शास्तीसह पुन्हा सुधारीत मालमत्ता कराचे बिल बजावण्यात येईल

(अजीज शेख)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका